# संदर्भ ग्रंथ सूची


| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | | लेखक |
|---|---|---|---|
| १) | संत कवि तुकाराम एक चिंतन – पृष्ठ क्र. 11, पृष्ठ क्र. 15 | | डॉ. निर्मलकुमार फडकुले |
| २) | तुकाराम व्यक्तित्व आणि कवित्व | – | डॉ. किशोर सानव प्रा. मनोज तायडे |
| ३) | श्री. तुकाराम अर्थात व्यवहार धर्म पृष्ठ क. 11 | – | दत्तात्रय विष्णु पारखे |
| ४) | संत तुकाराम व्यक्तित्व आणि कवित्व | – | डॉ. पुष्पलता शेटये |
| ५) | श्री तुकाराम महाराज गाथा भाष्य | – | ह. भ. प. वै.. शंकरमहाराज खंदारकर भाग – 1 |

# प्रकरण तिसरे

## तुकाराम दर्शन या सदानंद मोरे यांनी लिहलेल्या पुस्तकाचे धावते समालोचन त्यामागील त्यांची भूमिका :–

**डॉ. सदानंद मोरे हे स्वतः तुकारामांच्या पिढीतील दहावे वंशज आहेत ते स्वतः पिढीजात वारकरी तत्वज्ञ आहेत त्यांनी मराठी भाषेच्या संस्कृतीचा वेध घेवून तुकोबांच्या जीवनदर्शनाद्वारे नवीनदृष्टी मांडली आहे त्याचा अभ्यास.**

डॉ. सदानंद मोरे हे तुकारामांच्या दहाव्या पिढीतील वंशज स्वतः पिढीजात वारकरी, मराठी भाषेच्या संस्कृतीचा बहुजन समाज हा गाभा आहे देहुरकर मोरे घराणे जणु त्यांच्या केंद्रस्थानी आहे. या घराण्यातून आधुनिक विद्येचा पहीला पदवीधर होण्याची संधी डॉ. मोरे यांचे वडील श्रीधर अण्णा यांना लाभली असती पण १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात त्यांनी भाग घेतला त्यामुळे त्यांची ही संधी हुकली. तथापी त्यांचे चिरंजीव सदानंद यांनी विद्यापीठीय शिक्षणातील सर्वोच्च पदवी तर मिळवलीच पण स्वतःच्या कर्तृत्वाने पुणे विदयापीठाच्या प्राध्यापक वर्गात प्रवेश मिळवला.

तुकाराम दर्शन हे सदानंद मोरे यांनी लिहलेले पुस्तक श्री. दिलीप पुरूषोत्तम चित्रे आणि आधुनिकतेची पाळेमुळे भक्तिपरंपरेत शोधणाऱ्या समविचारी लेखक कवींना वाहीले आहे. लेखक स्वतः तत्वज्ञ आहेत त्यांनी मराठी भाषेच्या संस्कृतीचा वेध घेवुन तुकोबांच्या जीवनदर्शनाद्वारे नवीन दृष्टी मांडली आहे. वारकरी संप्रदाय हा मराठी संस्कृतीचा मुख्य प्रवाह तुकोबांना समजून घेतले म्हणजे वारकरी परंपरा समजलीच तुकोबांचे विचार हे वेगळे आणि स्वतंत्र दर्शन आहे. त्यांच्या मांडणीची सुरवात प्रथम ज्ञानदेवांनी केली तुकोबांनी ते पूर्णत्वाला नेले.

डॉ. मोरे यांना बहुपरीणामी तुकोबांचे दर्शन ही काही सोपी बाब नव्हे असे रास्तपणे वाटते.

प्रा. राम बापट यांनी या पुस्तकाला उचित प्रस्तावना दिली आहे. राम बापट पुस्तकाविषयी आपले मत मांडतात. डॉ. सदानंद मोरे यांचा तुकाराम दर्शन हा ग्रंथ मला फार महत्वाचा वाटतो महाराष्ट्राच्या सर्व सांस्कृतिक परंपरेचा एक दमदार आणि त्याचवेळी सडेतोड वेध होवून पुढची वाटचाल कशी करावी याचे स्पष्ट दिग्दर्शन करणारा त्यांचा हा लेखन व्यवहार आपल्याला मोठा दिलासा देतो बहुजन समाजातुन आलेल्या आणि सुक्ष्म चिंतनाचे सामर्थ्य अंगी बिंबवलेल्या पिढीचा हा पथदर्शक अविष्कार आहे असे मला वाटते

साहसवादी एकांगी भूमिका टाळून आत्मटीकेचे महत्व जाणुन त्याचवेळी



13802A

सांसकृतिक संचिताचे प्रेरणादायी विवेचन करणे ही गोष्ट मुळात कठीण आहे. पण डॉ मोरे यांनी ती समर्थपणे पार पाडली आहे.

डॉ. मोरे यांचा हा ग्रंथ फार उच्च दर्जाचा आहे आणि महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रातील सार्वजनिक कार्यकर्ते सामाजिक व सांस्कृतिक जीवनाविषयी ओठ असणारे सामान्य वाचक आणि इतकेच नव्हे तर शिक्षणाच्या सर्व पातळयावर कार्य करणारे अभ्यासक त्याची जाणतेपणाने दखल घेतील. कृष्णाच्या देवाच्या अवताराचे जे प्रयोजन म्हणजे धर्मरक्षण हे आपले जीवन कार्य असल्याचे तुकोबा घोषित करतात. मराठी समाजाची सांस्कृतिक व नैतिक इयत्ता ठरविण्याचा तुकोबा हा मानदंड आहे. सदानंद मोरे यांनी १०८ पैकी जवळ जवळ 30 – 35 लेखांमध्ये मराठी साहीत्यकारांनी आणि समिक्षकांनी तुकोबाकडे कवी म्हणून कसे पाहीले त्यांना काय प्रतिसाद दिला याचा अत्यंत व्यापक सर्वसमावेशक, चिकित्सक, अभिनव आणि वर्तमानकालीन चिंतन व संशोधनाला नवी दिशा सुचविणारा विचार मांडला आहे या सर्व लेखंमध्ये डॉ. मोरे यांची प्रतिमा आणि मांडणीतला सुक्ष्मपणा याचा ठसा आपल्यावर उमटतो. मुख्य म्हणजे भाषा विज्ञानाच्या संदर्भात गेल्या एक दोन दशकामध्ये जी बहुमोल मांडणी आज जगभर चालू आहे तिचे अनुसंधान राखुन मोरे यांनी हे फार मोठे काम केले आहे. वाङ्‌मय हे भाषेमध्ये निर्माण होत असते. भाषा ही एक सार्वजनिक व सामुदायिक बाब आहे. यामुळे सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्‌मयीन अभ्यासकाला भाषाशास्त्राच्या अभ्यासाचा उपयोग होती या सर्व गुंतागुतीच्या अभ्यासू पद्धतींचा संदर्भ मनामध्ये नीट बाळगुन मोरे यांनी तुकाराम आणि त्यांच्या प्रकाशात मराठीतील आधुनिक साहित्यव्यवहार याविषयी फारच मनोज्ञ विवेचन केले आहे.

हे पुस्तक लिहण्यामागे लेखकाची तीन उद्दिष्टे आहेत

1. संतविषयक सर्वसाधारण गैरसमजाविषयी स्वतः तुकोबा या व्यक्तिविषयी अनेक चुकीच्या कल्पना रूढ आहेत त्या दूर करून तुकोबांचे यथार्थ दर्शन घडवणे हे पहिले उद्दिष्ठ
2. महाराष्ट्राचे संस्कृतीपुरूष म्हणून तुकोबांचे वेगवेगळया कालखंडामधील

वेगवेगळया व्यक्तीनी आणि सांस्कृतिक समूहांनी मूल्यमापन केले त्यातून तुकोबांचे दर्शन घडते त्याशिवाय त्या त्या व्यक्ती व व्यक्तिसमूहांचेही दर्शन आपोआप घडते ते एकत्रितपणे प्रकट करणे हे दुसरे उद्दीष्ठ

3. संबंधित व्यक्ति वा समूहांना तुकोबा नेमके असेच का दिसले यामागील कार्यकारण भावाचा छडा लावणे हा तिसरा उद्देश

या तिहेरी प्रक्रियेतून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचा पट उलगडायला मदत होते. ही सिद्धी पण लेखकाला मिळवायची होती अशी उचित प्रस्तावना पुस्तकाला मिळाल्यामुळे पुस्तकाच्या आकलनाला तसेच साहीत्याच्या सौंदर्यात भर पडलेली आहे.

वारकरी संप्रदाय हा मराठी संस्कृतीचा प्रवाह असल्याचे दोन अभ्यासकानी निदर्शनास आणून दिले 1. राजारामशास्त्री भागवत 2. इरावती कर्वे दोघांचे अभ्यास संप्रदाय वेगवेगळे एकाला पारंपारीक ज्ञान मिळालेले तर दुसरी आधुनिक पद्धतीने अभ्यास केलेली विदुषी. मराठी संस्कृतीच मुख्य प्रवाह असलेल्या वारकरी परंपरेच्या शिखरस्थानी आहेत तुकाराम महाराज संत बहिणाबाईनी देवालयाचे रूपक करून जणू वारकरी संप्रदायाचा थोडक्यात इतिहास सांगितला आहे.

ज्ञानेश्वरांनी या देवालयाला पायाभरणी केली नामदेवरायांनी त्याचा विस्तार केला. एकनाथांनी त्याला खांब दिला तर तुकोबा त्याचे कळस झाले " तुका झालासे कळस" कळसाचे दर्शन झाले म्हणजे देवदर्शनाचे पूर्ण पूण्य मिळते अशी समजुत आहे. त्यानुसार तुकोबांचे दर्शन घडले तुकोबांना समजावून घेतले म्हणजे वारकरी परंपराच समजली म्हणजे मराठी संस्कृतीच्या आकलनाची कळच हातात आली. तुकोबा हे वारकरी परंपरेला आणि म्हणूनच मराठी संस्कृतीला आदर्श असलेले पुरूष होते. तुकोबा आणि मराठी संस्कृती यांच्या अतूट संबंधाचे एक भाषिक आहे. कुठलीही संस्कृती आकार घेते ते विशिष्ठ भाषेतच. मराठी वगळली तर मराठी संस्कृतीला वेगळे अस्तित्व नाही. भाषा आणि संस्कृती यांच्यामधील संबध हा जैविक आहे. संस्कृतीच्या भौतिक आणि आत्मिक गरजानुसार भाषा घडत जाते.

मराठी भाषेवर तुकोबांचा ठसा आहे. तुकोबांची कित्येक वचने मराठीत म्हणीच्या वाक्प्रचाराच्या रूपाने अमर झाली आहेत. सामान्य माणूसही सहजगत्या अशा वचनांचा उपयोग करतो त्याला ठाऊकही नसते हे तुकोंबाचे वचन आहे.

तुकोबा मराठीत मुरून एकजीव झालेले कवी होते डॉ बाबसाहेब आंबेडकर, आचार्य अत्रे यांच्या वर्तमान पत्राची शीर्षवचने तर पु. ल. देशपांडे यांचे " तुझे आहे तुझपाशी" किंवा गौरी देशपांडे यांचे दुस्तर हा घाट अशी नाटय कादंबऱ्याची नावे असोत शब्द मागायचे तर तुकोबांनाचा मागायचे " आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने" असे त्यांनी केव्हाच जाहीर करून टाकले. खरोखर तुकोबांचे धन म्हणजे शब्दांची रत्ने आहेत. ही रत्ने आजही आपणास उपयोगी पडत आहेत हया रत्नावरूनच आपण तुकोबांच्या किंमत करायला हा इतकी रत्ने स्वतःजवळ असणारा तुकोबा किंवा मोठा होता. या रत्नांच्या साहयानेच तुकोबांनी आपले कळसाचे स्थान बांधले आहे.

तुका म्हणे नव्हे दिसतो मी तैसा :–

ज्ञानदेवांचे चरित्र म्हणजे शांत आणि अद्‌भुत यांचे मिश्रण नामदेवांनी निरागस वात्सल्य भक्तीचा आदर्श दाखविला एकनाथांचा बाजच वेगळा हे चारही पूर्वसूरी तुकोबांनी आत्मसात केलेले आहेत किबहुना म्हणुनच ते कळस होवू शकले तुकोबा त्यांच्या समकालीकानमध्ये जसे वादग्रस्त होते तसे ते उत्तर कालिनामध्येही वादग्रस्त राहीले.

आजही वादग्रस्त आहेत वादग्रस्तेला सुरवात अगदी जन्मापासून म्हणजे त्यांची जात कोणती ? या प्रश्नापासूनच आणि एकदा चिकटलेली ही वादग्रस्तता प्रयाणानंतरही त्यांची पाठ सोडायला तयार नाही म्हणूनच तुकोबांचे दर्शन ही काही सोपी बाब नव्हे तुका म्हणे नव्हे दिसतो मी तैसा म्हणून स्वतः तुकोबांनी आपल्या दर्शनेच्छूंची पंचाईत करून ठेवली आहे. तुकाराम दर्शन या पुस्तकाची सुरूवात तुकोबांच्या समकालीन पासून झाली आहे व शेवट लेखकाच्या समकालीनापर्यंत झालेला आहे.

आपल्या बुद्धीसामर्थ्याने वेगवेगळया विचारवंताना एकत्र आणून वेगळे दर्शन घेवू शकतो.

आजही कोणी मार्क्स आणि गांधी, कोणी मार्क्स आणि आंबेडकर यांच्या एकत्रीकरणाची भाषा बोलताना दिसतातच लेखकाला यातुन असे वाटते की प्रश्न पडतो की, ते दांन विचारवंत ऐकमेंकाबद्दल काय विचार करीत किंवा त्यांच्यात कालाचे अंतर असेल तर निदान उत्तरकालीनांला पूर्व कालीनाबद्दल काय वाटते होते.`

यामध्ये असे वाटते की दोन विचारवंत एकत्र आणून वेगळे दर्शन घेतात कारण त्या विचारवंताल कालापेक्षाही विचार साधर्म्य महत्वाचे असते इथे काळापेक्षा त्यांची वैचारिकता एकत्रीत आणली जाते. तुकोबा व ज्ञानदेवामध्येही हेच वैचारिक साधर्म्य होते म्हणूनच वारकरी परंपराच काय पण बुद्धीवादी या दोन्हीना एकरूप पाहुन त्यांची वैचारिकता जाणली जाते. इथे काळाचा विचार करत नाही. बुद्धीवान विचारवंत इथे जाती धर्माचा विचार करत नाहीत ज्ञानदेव नामदेव कबीर एकनाथ ही आपली पूर्वपरंपरा तुकोबानी एका खेळीयात सांगून टाकली आहे. आपल्या परंपरेचे जनक म्हणून तुकोबांना ज्ञानदेवाबद्दल अपंरपरा आदरभाव होता तुकोबा दर वद्य एकादशीला आळंदीला जावून ज्ञानदेवांच्या समाधीपुढे किर्तन करीत देहू येथील आपल्या पूर्वजांनी बांधलेल्या श्री विठ्ठल रखुमाईच्या मंदीराचा जीर्णोद्धार तुकोबांनी केला हे अनेकांना माहीत आहे त्याची नोंद तुकोबांनीच केली आहे परंतु आळंदी येथील ज्ञानदेव मंदीराचे बांधकामही तुकोबांनी केले हे किती जणाला माहीत आहे ? गेल्या शतकातील एका गॅझिटियरमध्ये त्याची नोद ब्रिटीशांनी करून ठेवली आहे.

तुकोबांचे असेच पिढीजात वारकरी घराणे. अशाच वारकरी घराण्याला परंपरेचा तुकोबांना अभिमान होता.

तुकोबांचे धाकटे बंधु कान्होबा दोघांच्या वयात फारसे अंतर नव्हते समृद्ध वैष्णव कुळात बालपण गेल्यामुळे दोघांवर समान संस्कार झालेले. दोघे लहानपणी एकत्र खेळलेले वडिलांबरोबर दोघांनी घराण्याच्या मालकीच्या विठ्ठलमंदीरात भजनपूजनादी सेवा केलेली त्यामुळे तुकोबांना जवळुन ओळखणारा कान्होबा इतका कोणीही नाही

समान संस्कार ही एक बाब मात्यापित्यांचा वियोग, थोरल्या बंधुचा गृहत्याग, दुष्काळाचा फटका असे अनुभवही दोघांनी सामुदायिक रीत्याच घेतले म्हणा तुकोबांप्रमाणे कोन्होबाही कवि झाले १६२८ ला जो दुष्काळ पडला दुष्काळाने गांजलेल्या आपल्या दुकांना, ऋणकांना कर्ज माफ करून तुकोबांनी आपल्या वाटयाची खतपत्रे इंद्रायणी नदीत बुडविली कान्होबांच्या वाटयाला आलेली खतपत्रे कान्होबा बुडवू शकले नाहीत तेव्हा कान्होबांना लौकिक धनाचे महत्व वाटत होते परंतु तुकारामांच्या मुत्यूनंतर कान्होबांना तुकारामांच्या अलौकीक धनाची महती वाटली. असामान्य माणसाकडे आपण सर्वसामान्य दृष्टिने पाहीले याची खंत कान्होबाना नंतर वाटली. दुष्काळामुळे तुकोबांचे धन आणि मान या गोष्टी किती अशाश्वत आहेत याचा प्रत्यय आला अशा अशायवत गोष्टीमध्ये अडकून बसण्यात मानवी आयुष्याची इति कर्तव्यता कशी असेल याचा ते विचार करू लागले. श्वाश्वताचा शोध घेण्यासाठी संत वाङःमयाचे परिशीलन सुरू केले चिंतन मनन करू लागले, कीर्तन करू लागले या प्रक्रियेने संसार प्रंपचाकडे दुर्लक्ष होवू लागले संत म्हणून संताला मिळालेले दान तुकाराम स्वीकारत नसत याबद्दलच्या अनेक आख्यायिका आहेत या ग्रंथातही एका प्रसंगाचा उल्लेख समर्पकरीत्या आला आहे. एकादा कोणीतरी तुकारामांकडे धान्याची गोणी आणून टाकली त्यातील धान्य तुकोबांनी वाटून टाकले घरात अन्नाचा कण नसताना घरात आलेले धान्य वाटुन टाकल्यावर त्याचा संताप पत्नी आवली हिला येणे यात आवली उर्फ जिजाई हिचा प्रांजलपणा दिसून येतो. आपल्यापेक्षा ही दारिद्रयात असणारे लोक आहेत असे तुकारामांना वाटले त्यातून तुकारामांचे मोठे मन दिसून येते.

या तुकाराम व जिजाई यांच्या पती पत्नीच्या संदर्भात महर्षि शिन्दे यांनी जिजाईचे मोठेपण वर्णन करणारे एक सुंदर कवन रचले. ' अवलाईची नवलाई ' या त्यांच्याच कवितेतील काही ओळी येथे देत आहे.

अशी कशी तुक्याची अवलाई । ऐका ही तिची नवलाई ।। धृ ।।
तुक्या आम्हा सर्व संत परि तुक्याला अवली संत

नसे तियेला त्याची खंत । सोडून गेला तरी राही तीच ती अवलाई ।।
इतर सती त्या चिते जळाल्या । संसारीच्या ज्वाळा गहि–या । ।
अवलीने पण त्याही गिळल्या । डगमगली ना केव्हाही ।।
आम्ही तुकोबा सदैव वंदू। परी अवलाई कधी न निंदू तया तियेचा ऋणानुबंधु
जगि पसरो ही अख्याई । मागणे लई नाही ।

असा महिर्षी शिन्दे यांनी लिहलेल्या अवलाईच्या कवनाचा उल्लेख तुकाराम दर्शनमध्ये डॉ. मोरे यांनी दिलेला असल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची उंची वाढते. कळस म्हणून तुकारामाचा जास्त गौरव केला त्या कळसाचे प्रखर तेज उच्चवर्णियांना खपले नाही त्यामुळे तुकारामावर खरमरीमत टीका झाली. तुकारामाचा मोठेपणा काही अल्पबुध्दी लोकांना खपला नाही. " महाराष्ट्र सारस्वतमध्ये " तुकोबासंबंधी लिहीताना भाव्यांनी रामदास आणि तुकाराम अशी एक कलमवार तुलनाच केली. शाळकरी विदयार्थी तांबडया पेशी आणि पांढ–या पेशी यांच्यात जशी सरळसोट बाळबोध तुलनाच करतात. तशी ही भाव्यांची तुलना आहे. या तुलनेविषयी नापसंती व्यक्त करणारा चातुर्मास्य तुकोबा व टवाळी हा लेख शिंद्यानी सुबोध पत्रिकेमधून लिहला. या लेखात भाव्यांनी केलेली तुकाराम – रामदास ही तुलना संक्षिप्त व सौम्य स्वरूपात उध्दृत केली ती अशी

1. तुकाराम संसारात गुरफटलेला – रामदास विरक्त.
2. तुकाराम संकटे डौलाने सांगतो – रामदास 'ब्र' ही काढीत नाही.
3. तुकारामाला शेवटी काळजी बायकोची – रामदासाला शिवाजीची.
४. तुकाराम अडाणी – रामदास आचार्य.
५. तुकारामाकडे राजकारण नाही – रामदास मुत्सद्दी.
६. तुकारामास लंगोटीची आवड – रामदासास गाढवाचा तिरस्कार.
७. तुकाराम पंढरीपलीकडे गेला नाही – रामदासाने हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत ११०० मठ स्थापिले.
८. तुकाराम दैववादी खुळचट – रामदास प्रयत्नशील वीर.

९. तुकाराम परंपरेत रूतलेला — रामदासाने नव्या वाटा पाडल्या.

10. तुकारामाचा शिष्यांवर दाब नसे — रामदास खरमरीत शासन करी.

11. तुकारामाचा जगाला उद्देश — रामदासाला महाराष्ट्रापुढे जग अल्प

12. तुकाराम रानातला टाळकुटया — रामदासाचे ध्येय महाराष्ट्राचे

या तुलनेसंबधी शिंदयाना खूप काही लिहता आले असते पण तसे करण्याऐवजी त्यांनी तुकोबांचा एक अतिशय उच्च दर्जाचा अभंग— घोटवीन लाळ ब्रम्हज्ञान्याहानी मुक्त आत्मस्थिती सांडवीन उध्दृत केला व लिहले तुकाराम प्रत्यक्ष ब्रम्हज्ञानालाही लाळ घोटायला लावीत आहे तरी हे भटजी आजकालच्या ब्राम्हण ब्राम्हणेतर वादाचा कोळसा उगाळून त्याचा टिळा प्रत्यक्ष तुकारामानांच लावत आहेत.

अभिजनवादी पांढरपेक्षा वृत्तीच्या लोकांनी कुत्सित बुद्धीची टीका असंस्कृत माणसे करीत राहतात त्याला शिंदे यांनी थोड्क्या व समर्पक शब्दांत उत्तर दिले आहे. शिन्दे यांनी अश्या टीका करणाऱ्या लोकांशी वाद घालण्यापेक्षा किंवा त्यांच्यावर टीका करण्याला आपली बुद्धी वेळ वाया घालवला नाही शिन्दे यांनी आपली मानसिक उंची कधी कमी केली नाही.

बहुजन समाजाच्या लोकांनाही महार्षि शिन्दे यांची उपेक्षा केली आहे. अवहेलना केली आहे. महाराष्ट्राच्या समाज जीवनातील हे कटु सत्य आहे. लेखकांनी आपल्या ग्रंथात याची नोंद घेतली हे फार चांगले झाले आहे. सदानंद मोरे यांनी महात्मा फुले यांचे सत्यशोधक ब्राम्हणेतर जहाल विचारांचे होते हे अगदी बरोबर आहे असे आम्हास वाटते. भूतदयेने कधीही समता प्राप्त होत नसते. विवेचक न्याय बुद्धीही समता प्राप्त करू शकते दयाबुद्धीने समता प्राप्त होत नाही. विठ्ठल रामजी शिन्दे या फक्त एकाच विचारवंताजवळ राजवाडयांना व त्यांच्या कंपूला सरळ भिडण्याचे सामर्थ्य होते. पण फुले नावाची दुर्गंधी लिहणाऱ्यावर साळुंखे मोरे यांनी एकत्र येवून भिडण्याचे सामर्थ्य त्यांच्यात का असू नये.

महाराष्ट्र सारस्वत हा ग्रंथ कितीतरी वर्षे मराठी वाङःमयेतिहासाचा प्रमाण ग्रंथ म्हणून महाराष्ट्रातील वेगवेगळया विद्याठांच्या बी, ए, एम. ए. च्या अभ्यासक्रमात समाविष्ठ असे मराठी घेवून पदवी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अनेक पिढयांनी भाव्यांची ती बारा कलमी बखर अनुभवली वारकऱ्यांना ही तुलना अनेक वर्षे खुपत होती. ब्राम्हणेतर चळवळीचा वारसा सांगणाऱ्या नागपूर आणि शिवाजी विद्यापीठांनी हा मजकुर अभ्यासक्रमातून गाळण्यात आला असल्याची घोषणा केली पूणे विद्यापीठानेही हा मजकुर अभ्यासक्रमातुन गाळण्यात यावा अशी चळवळ वारकरी महामंडळीनी केली या चळवळीला अनेक मंडळीने पाठिंबा दिला त्यात गुरूवर्य बा. ग. जगताप, एस्. एम. जोशी, राममाऊ म्हाळगी बाबा आढाव इत्यादी मान्यवरांचा समावेश होता. कोल्हापूरचा सत्यावादी, प्रभात, विशाल सह्याद्री या वृतपत्रानी खास अग्रलेख लिहून आंदोलनाला पाठिंबा दिला वारकऱ्यांची मागणी मान्य करायला तत्कालीन मराठी विभागप्रमुख रा. श. वाळिंबे अनुकुल नव्हते पण कुलगुरू महाजनी यांनाच वारकऱ्यांचा मुद्दा पटला व त्यांनी वाळिंब्याना पटवला शेवटी अभ्यास मंडळाचा ठराव होवून मजकूर वगळण्याचे परिपत्रक निघाले. या घटनेनंतर बरेच दिवस याची चर्चा चालू होती.

रामदास तुकाराम तुलना हे काही भाव्यांचे मराठी सारस्वताला योगदान नव्हे. तुकोबांच्या चारित्र्यहननचा व विकृतीकरणाचा भाव्यांनी जणू चंगच बांधला होता. त्यांनी त्याची एकही संधी सोडली नाही.

राजवाडे, भावे,, ना. कृ. गद्रे अशा तिघानी तुकोबांवर अनेक घाणरडे आरोप केले. या तिन्ही लोकांची कीव करावीशी वाटते कारण तुकारामा सारख्या एवढया मोठया समुद्राचे पाणी खारट आहे हे सर्वाना माहीत असताना त्या पाण्याचे समाजाला होणारे फायदे माहीत असताना ते कडवड आहे म्हणणे हा राजवाडे भावे व गन्द्रे यांचा खुळचट पणाच दिसतो.

म्हणे रामश्वेर भट द्विजा । तुका विष्णु नाही दुजा

रामेश्वर भट बहुलकर यांनी तुकारामाना आव्हान दिले वहया बुडवायला

लावल्या आणी तुकोबांनी आपला शंभरनंबरी कस सिद्ध करून दाखवला तेव्हा रामेश्वर पूर्ण वितळले तुकोबांचे भक्त बनले तुकोबांची पात्रता ज्ञानोबाइतकी आहे याची खात्री रामेश्वरांना पटली आता ही बाब इतरांना पटवून दयायची आहे परंतु इतरांना म्हणजे कोणाला? याचे सरळ स्पष्ट उत्तर म्हणजे महाराष्ट्रातील ब्राम्हणाना होय एखादया माणसाची नेमकी लायकी काय? हे कळण्यासाठी विशिष्ठ पात्रता लागते तुकारामकालीन महाराष्ट्रांत यांच्या ज्ञानाच्या सर्व किल्ल या ब्राम्हणांच्याच कमरेला असल्यामुळे तुकोबा किती खोल पाण्यात आहेत हे पाहिल्यांदा समजले ते ब्राम्हणांना आणि ज्यांना समजले त्यांनी ते सांगितले ब्राम्हणानाचा ही इयत्ता ते ब्राम्हणाच समजून सांगतात.

म्हणे रामेश्वर भट द्विजा। तुका विष्णु नाही दुजा ।

हे द्विज ही तुकोबा आणि विष्णु यांच्यात भेद नाही रामेश्वरांना हे सांगावे लागते यात महाराष्ट्रातील ज्ञान अभ्यास आणि अधिकार यांचा पूर्ण आलेख येतो विठ्ठल रामजी शिन्दे यांची पात्रता महाराष्ट्रातल्या किती मराठयांना ठाऊक आहे? फुले आंबेडकर यांचा जय म्हणणे सोपे आहे. त्यांच्या कामगिरीचे यथार्थ मुल्यमापन किती ब्राम्हणेतर व दलित करू शकतील? शेवटी प्रमाणपत्र हे ब्राम्हणानेच दयावे लागते. तेव्हा तुकारामकालीन परिस्थीती आजही काही गुणात्मक फरक पडला आहे असे म्हणायला जागा दिसत नाही.

हा रामेश्वर भटांचा मुद्दा मांडून लेखकांनी बहुजन समाजाचे एक चित्र मांडून आजही बहुजन समाज बौद्धिक क्षमतेच्या बाबतीत स्वतःला किती मागासलेला समजतो याची एक चुणूक दाखविली आहे. बहुजन समाज हा कस्तुरी मृगाप्रमाणे आहे. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

तुक्या केवळ पांडुरंग

महाराष्ट्रापुरते बोलायचे म्हणजे वारकरी परंपरेने पहिल्या पासून स्त्रियांना स्थान दिले हे स्थान केवळ वाती वळून श्रवणभक्ती करण्यापुरते मर्यादित नव्हते हा मुद्दा महत्वाचा आहे जनाबाई, मुक्ताबाई, सोयरा इ. अगदी वारकत्त्यांच्या

आदिकालातील अभंगरचना करणाऱ्या स्त्रियांची नुसती नावे घेतली तरी पुरेसे आहे या स्त्रिया जेव्हा अभंगागधून आत्माविष्कार करत होत्या तेव्हा भारतातल्याच काय, परंतु जगातल्या अन्य भाषांममध्ये किती स्त्रिया लिहीत होत्या याचा हिशोब मांडायला बसले म्हणजे मराठीत काव्यरचना करणाऱ्या या स्त्रियाबद्दल आदरभावच वाढेल परंतु ज्या परंपरेने त्यांना अभिव्यक्तिसठी अवकाश देवू केला त्या परंपरेचा थोरपणाचा ही विचार करावा लागेल बहिणाबाई या वारकरी परंपरेतील अखेरच्या कवियत्री त्या तुकाराम महाराजांच्या समकालीन मध्ये मराठी इतिहासात बहिणाबाईचे स्थान अनेक कारणामुळे अनन्य साधारण मानले लागेल.

बहिणाबाईने लिहले आत्मचरित्र हे स्वतः त्यांचे चरित्र समजण्याचे महत्वाचे साधन तर आहेच परंतु ते तुकोबांभोवती फिरत असल्यामुळे ते तुकारामांच्या चरित्राचे ही अस्सल साधन आहे. तुकोबानंतर वारकरी संप्रदायाला बहिणाबाई पचनी पडल्या नाहीत कारण पुरूष केंद्रित समाजरचना ब्राम्हणबाइ शुद्राला सन्मान मुमुक्षकार लक्ष्मण पांगारकर यांनी सुद्धा त्यांच्या पुरूषी अहंकारामुळे तसेच सनातनी मनामुळे बहिणाबाईचा चालत आलेला अधिकार नाकारला. याची खंत वाटते. संत वाङःमयावर पांगारकरांनी विपुल लेखन केले आहे पण त्यांच्या लिखाणात संशोधन व पुराणिक या दोघांच्या शैलीचे चमत्कारीक मिश्रण झालेले दिसते.

पांगारकारांचे लिखाण म्हणजे भाबडी भावूकता म्हणावी लागेल वारकरी व सनातनी या दोघांना सांभाळताना पांगारकरांची चांगली तारंबळा उडालेली दिसते.

तुकोबांच्या बरे देवा कुणबी केलो । नाही तर दंभेची असतो मेलो या अभंगावर टिप्पणी करताना ते म्हणतात वरील उद्गारावरून तुकोबांचा ब्राम्हणांवर कटाक्ष आहे असे कोणी समजु नये. ही आपली निंदा आहे असे ब्राम्हणांनी समजु नये पांगारकर सनातन धर्माच्या चौकटीतून वारकरी विचारांच्या व तुकोबांच्या चरित्राचा अन्वयार्थ लावू पाहणारे अभ्यासक होते. शेवटी प्रत्येक व्यक्तीच्या स्वतःच्या काही मर्यादा असतात.

भागवत महाराज

तुकोबांचे वंशज आणि देहूकर फडाचे प्रमूख भागवत महाराज यांनी मात्र या काळात सरळसरळ सत्यशोधक ब्राम्हणेत्तर चळवळीत प्रवेश करून या चळवळीला धार्मिक पाठबळ दिले महाराज अत्यंत धाडसी हजरजबाबी आणि स्वतंत्र विचाराचे होते. प्रसिद्ध ब्राम्हणेतर नेते केशवराव जेधे यांच्या पुतणीचा विवाह देहुकर मोरे इनामदाराच्या घराण्यातील बाळकृष्ण बुवाशी लावण्यात त्यांचाच पुढाकार होता हा विवाह अर्थातच सत्यशोधक पद्धतीने झाला स्वात: भागवत महारांजांनी आपला विवाह आंळंदीच्या सत्यशोधक राजकारणी कबीर बुवांच्या घराण्यातील मुलीशी सत्यशोधक पद्धीतीने केला. तेव्हा सर्वत्र खळबळ माजली वारकऱ्यांमधील सनातनी पक्षाच्या महाराज फडकऱ्यांना तो एक धक्काच होता.

भागवत बुवांचे अभिनंदन करताना जागृतिकार परळेकरांनी लिहले " यात महाराजांनी भागवत धर्माच्या व तुकोबारायांच्या शिकवणी विरूद्ध काहीच केले नाही. उलट तत्कालीन परिस्थितीमुळे तुकोबाना जे करता आले नाही ते त्यांनी करून दाखविले.

हे परीवर्तन कशामुळे होवू शकले तर तुकाराम महाराजांच्या विचारातून ही परीवर्तनाची ताकद समाजाला मिळू लागली. आंबेडकर आणि फुले या दोन्ही थोर व्यक्तींनीही तुकाराम महाराजांच्या विचारातूनच व अभ्यासचिकित्सेतून आपल्या कार्याचि सुरवात केली म्हणूनच एक सांगावेसे वाटते की बुरसटलेला गाळात रूतून बसलेला, बहुजन समाज हा वर येण्यासाठी तुकाराम महाराज कळसावर स्थानापन्न झाले होते.

तुकाराम दर्शन या ग्रंथाद्वारे सदानंद मोरे यांनी इतिहासातील अत्यंत बारकावे जे समाजाला अजूनही ज्ञात नाही अश्या बारकाव्यांचे अत्यंत उत्कृष्ठ संकलन केले आहे.

बहुजन समाजाचे शिक्षण वाढले पण समाजाला आपल्या इतिहासातील अनेक बाबींचे ज्ञान नाही तुकारामाचे अभंग घराघरात पाठ आहेत पण त्यांच्या अनुषंगाने इतिहासातील काही गोष्टींचा उलघगडा अजून समाजाला झाला नाही.

सदानंद मोरे यांनी तुकाराम दर्शनाच्या निमिताने केलेले अत्यंत सखोल संशोधन आम्हाला वाचायला मिळते ही अभिमानाची बाब आहे. हे संकलन समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचणे गरजेचे आहे.

आतापर्यंत असे घडत आले आहे की एखादी गोष्टी समाजापुढे आणायची झाल्यास त्यातील महात्वाच्या गोष्टीची काटछाट करून ती समाजापुढे आणली जाते, व मूळ गोष्टीपासून समाज अंधारात राहीला जातो तुकाराम दर्शन या ग्रंथात अशा अनेक बाबी नमूद आहेत

1. आकाशवाणीवरील कार्यक्रम –
2. तुकारामाचा चित्रपट – ४२१

दुर्जनांचा मान । सुखे करावा खंडण ।।
लाय हाणोनिया वरी । गुंडा वाट शुद्ध करी
बहुता पिडी खळ । त्याचा धरावा विटाळ
तुका म्हणे नखे । काढून टाकिजेती सुखे ।। ( २१३८ )

या अभंगावर भाषा करण्याची गरज नाही इतका तो स्वयंप्रकाशी आहे पण तरीही तुकोबांच्या व्यक्तित्वाचा नेमका हाच भाग अंधारात गेला उदाहरणच दयायचे झाले तर प्रभातच्या संत तुकाराम चित्रपटात विष्णुपंत पागनीसानी उभ्या केलेल्या तूकोबांच्या व्यक्तिरेखेत त्या अभंगाचा मागमूसही नाही प्रभात वाल्यांनी मंबाजी आणि रामेश्वर या दोघांनाही बाजूला ठेवून सालोमालोलाच प्राधन्य दिले आहे. हरिदासी कथाकारांनी, नाटक, सिनेमावाल्यांनी, तुकोबांचे जे चरित्र रंगवले आहे ते व्यवहरशुंन्य या अर्थाने भोळया माणसाचे आहे अशा माणसाला आपण सहज फसवू शकतो. पण आपण फसवले गेलो हे त्याच्या धान्यातही येत नाही.

तुकोबाना ज्या प्रकारच्या भक्तीचा आणि जगाच्या व्यवहार करायचा होता त्यासाठी जाणोनि नेणीनि अंगा आली दशा अशी अवस्था म्हणजे भोळेपणा आवश्यक होता या अवस्थेत ज्ञात नाही असे नाही तर ज्ञात होवून ते गुंडाळून ठेवले आहे. हा भाव म्हणजे वारकरी अर्थात भोळा भाव आहे आणि असा भोळा हा साधा

नसून तुका म्हणे भोळा । जिकू जावे कळीकाळा (७१८) या कोटितला असतो.

तुकाराम व त्यांचे शब्द

❖ विनोबा भावे तुकारामांबद्दल म्हणतात ख्रिस्त, तुकोबा, आणि टॉलस्टॉय यांचे शिव्याशापही गोड तुकोबांचे तोंड खवळलेले पण हदय मात्र कोमल विनोबा सांगतात की तुकोबांच्या शब्दात जी कटुता आहे ती केशराची कटुता आहे. ती गोड आहे. तुकारामाने जरी आम्हाला मारले टिपले तरी ते गोडच आहे. कारण ते जगाच्या कल्याणाच्या प्रेरणेने, तळमळीने निघालेले आहेत.

❖ आपले शब्द महाभारतातील अर्जुनाचाही पराभव करू शकणाऱ्या बभ्रवाहनासारखे मर्मभेदक आहेत हे तुकोबा जाणून होते.

तुकोबांनी ज्यांना कठोर शब्दानी फटकारले त्यांच्याविषयी त्यांना आस्था आणि चिंता होती त्यांचे अंतःकरण आईसारखे होते मामासाहेब दांडेकर म्हणायचे. आई एखादे वेळी चिडून मुलाला मर मेल्या म्हणते पण तिला जग असेच म्हणायचे असते. तसेच तुकोबांच्या अपशब्दांचे आहे. क्षोभ आणि कृपा मातेचे समान असे तुकोबांनी म्हटले आहे.

स्वतः तुकोबांना आपण कडक बोलतो याची जाणीव होती किंबहुना ते मुद्दामच बोलत असत त्यांचे शब्द ही त्यांची शस्त्रे होती आपल्या कठोर शब्द प्रयोजना मागील भूमिका तुकोबा वैद्याच्या रूपकातून स्पष्ट करून सांगतात.

नव्हे वैद्य आम्ही अर्थाचे भुकेले । भलते द्यावे पाळे भलत्यासी.
कुपथ्य करूनि विटंबावे रोगी । काय हे सलगी भीड त्याची ।।
तुका म्हणे लासू फासू देवू डाव । सुखाचा उपाव पुढे आहे.
पोभाळीता चरे अंनरीचे दुःख लासे फासे मुख उघडावे
पाया झाले नारू । तेथे बांधला कापरू । तेथे बिबव्याचे काम ।
अधमासी तो अधम ।।

या उदाहरणाचा इत्यर्थ रोग आणि रोगी यांची अवस्था पाहुन वैद्य औषधांची योजना करत असतो. रोगाची गंमीर अवस्था असेल तर उपाय योजनाही

जालीम करावी लागते. तेथे रोग्याच्या मर्जी गैरमर्जीचा विचारच करता येत नाही रोग्याला तो उपाय आवडता नाही तरी अंतिमतः त्याचाच हिताचा असतो.

ज्ञानेश्वरांच्या काळी जी समाजस्थिती होती ती पाहता ज्ञानदेवांचा नुसता सूचक उपदेशही लोकांना पुरेसा होता पुढे परचक्रामुळे प्रचंड उलथापालथ होवून समाजाची घडी पार विस्कटली. लोक दादा बाबा करून ऐकण्याच्या पलीकडे गेले तेव्हा एकनाथांनी विनोदाचा आश्रय घेवून समाजाची चिकित्सा केली तुकोबांच्या काळात तर परिस्थिती आणखी बिघडली लोक ज्ञानदेवांनी शाल जोडीतून जोडे मारले हाते त्यातील जोडे सोयीस्कररीत्या बाजूला ठेवून शाल मिरविण्याइतके चलाख व एकनाथांच्या म्हणण्याचा रोख नजरेआड करून विनोदाकडे हसण्याइतके निर्लज्य बनले अशा परिस्थितीत तुकोबांनी शब्दांचा आसूड करून त्यांचे कोरडे संबंधितांवर ओढले. तुकोबा हे समाज समीक्षक व समाजशिक्षक होते. दोषांवर पांघरूण घालण्याऐवजी त्यांनी ते चव्हाटयावर मांडले.

महाराष्ट्रातील राजकारण, समाजकारण , संस्कृतिकरण आणि अभ्यास कारण कसे परस्पर संबंध होते हे समजण्यासाठी तुकाराम अभ्यास ही महत्वाची बाब ठरते. संशोधकाचे शोधकार्य मुल्यनिरपेक्ष हवे संशोधकाने आपली आवड नावड, पसंती नापसंती, इच्छा आकांशा, ग्रह आग्रह थोडक्यात आपली मुल्ये संशोधनात आणू नयेत तो तटस्थ व अलिप्त हवा विठ्ठल रामजी शिन्दे काय किंवा वि. का. राजवाडे काय अशाच प्रकारच्या निरपेक्षतेचा उद्घोष करताना आढळतात हा उद्घोष कितीही आकर्षक असला तरी संशोधनाच्या व्यवहारात तो पाळला जात नाही हे वास्तव मान्य करावेच लागेल ब्रिटीशाच्या पारतंत्र्यांत असलेले संशोधक आणि कायकर्ते आपल्या सद्यकालीन राजकीय व सामाजिक अवनत अवस्थेचा विचार करू लागले तेव्हा त्यांना अवघ्या दोन अडीच शतकांपूर्वी छत्रपती शिवरायांनी केलेल्या स्वराज्य स्थापनेची कामगिरी आठवणे साहजिकच होते शिवरायांनी मराठी स्वराज्य स्थपिले हे जसे खरे तसे त्यांनी सारा मराठी मुलुख या स्वराज्याच्या पाठीशी उभा करण्यात यश मिळविले होते हेही खरे म्हणजेच

राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक ऐक्य या दोन्ही बाबी त्यांनी एकाच वेळी साध्य करून दाखवल्या नव्या पारतंत्र्यामधील सत्ताधा–यांना या दोन्ही बाबींची पुनरावृत्ती नको होती. मराठी राज्य एक आकस्मितरित्या घडून आलेली घटना होती तिला कोणतीही वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी नव्हती. अशी भूमिका ग्रँड डफ सारखे इतिहासकार घेते झाले हे अगदी स्वाभाविक होते. कारण ते आता राजकीय व सामाजिक पुनरूत्थाची स्वप्ने पाहत होते. इस्लामी पाररतंत्र्यातून मराठयांनी मुक्त घेवून स्वराज्य स्थापणे आणि त्यानंतर इंग्रजी पारतंत्र्यात बळी पडणे या दोन महत्वाच्या ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ लावल्याशिवाय एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राचे पाउल पुढे पडणे शक्यच नव्हते मराठयाच्या राज्यामागच्या जो महाविचार होता तो ग्रँड डफला कळला नाही म्हणून त्याला मराठयांच्या हालचाली सैरावरा वाटल्या न्यायमूर्ती रानडे यांनी मराठयांच्या हालचाली दिशाहीन निःसूत्र निरर्थक नसून उद्दीष्टपूर्ण होत्या हे सांगितले न्यायमूर्ती रानडे व राजारामशास्त्री भागवत यांनी भागवत धर्माची जी मांडणी केली ती अत्यंत व्यापक व सर्वसमावेशक होती तिच्यात रामदास व त्याचा महाराष्ट्र धर्म यांना महत्वाचे स्थान होतेच पण राजवाडे यांनी मात्र भागवत धर्म व महाराष्ट्र धर्म हे जणू दोन धूवीय विरोधक आहेत अशा प्रकारे मांडणी केली.

राजवाडे यांनी भागवत धर्म व तुकोबा यांच्यावर चौफेर हल्ले चढवून त्यांचे विकृत दर्शन घडवले. काळ्याकुट्ट पार्श्वभूमीवर महाराष्ट्र धर्म आणि रामदास यांचे झगमगती चित्रे उठवून दिले. राजवाडयांनी तुकोबा हा अध्यात्मिक विचाराचा व रामदासांचा पॉझिटिव्ह विचारांचा असे दोन खंड कल्पले.

मराठी माणूस ज्या सदगुणासाठी तुकोबांची चाह करतो ते गुण नसून दोष आहेत असे दाखविण्याचा राजवाडयांचा प्रयत्न होतो. तुकोबांनी शिवारायांनी पाठविलेले राजवैभव नाकारणे हा तुकोबांच्या आत्यंतिक निस्पृहतेचा भाग होता त्यात त्यांना ना शिवरायांचा अनादार होता ना त्यांच्या स्वराज्य स्थापनेविषयी

उदासिनता हेच राजवाडे ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकरांवर त्यांच्या राजाश्रय लोलुपते मुळे तुटून पडतात. राजवाडे यांनी भागवत धर्म व तुकोबा यांच्यावर सतत टीका केली.

राजवाडयांच्या धर्मचक्र परीवर्तनाची योग्य दखल घेवून रानडे भागवतांच्या उदार आणि समावेशक सिध्दांताची नव्याने फेरमांडणी करण्याचे सामर्थ्य तेव्हा कोणातच नव्हते.

ब्राम्हणेतर अभ्यासकांनी जो प्रतिवाद केला तो बराचसा प्रतिक्रियात्मक आणि शिवराळ स्वरूपाचा होता. शिविला शिवी अशी परतफेड केल्याचे मानसिक समाधान त्यांना लाभले असेलही पण राजवाडे यांच्या शिव्यांना सैद्धांतिक उंचीचे आणि व्यासंगातील खोलीचे पाठबळ होते विठ्ठल रामजी शिन्दे या फक्त एकाच व्यक्तीजवळ विचारवंताजवळ राजवाडयांना व त्याच्या कंपूला भिडण्याचे सामर्थ्य होते. त्यांच्या पद्धतीने ते आवशकता वाटली तेव्हा भिडले देखील पण एकतर त्यांचे हे प्रधान कार्य नव्हते आणि दुसरे असे की त्यांची परंपरा चालवू शकणारा ताकदीचा मातब्बर अभ्यासक ब्राम्हणेतरात झाला नाही. बहुतेक ब्राम्हणेतर तात्कालिन राजकीय लाभाच्या मागे लागले आणि शिंद्यासारख्या मोहरा गमावला. ही सांस्कृतिक घसरण अद्यापही चालू आहे

ही घसरण मला वाटते की राजकारण्यांनी थोपवू नये तर सदानंद मोरे व आ. ह. साळुंखे यांच्यासारख्या विद्वांनानी थोपवावी. त्याऐवजी दोघांनी आपसात भांडत बसावे हे उचित वाटत नाही.

१९५६ साली पंडित नेहरूनी शिवाजी महाराजाच्या पुतळयाचे अनावरण करण्यात नकार दिला कारण त्यांनी कुठेतरी वाचले होते की शिवाजी हा लुटारू होता परंतु यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रातून दोन चार ऐतिहासिक पुरावे नेवून नेहरूचा गैरसमज दूर केला हे अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या राम प्रधान यांच्या शब्दांचे सामर्थ्य या पुस्तकात वाचावयास मिळते हे वाचल्यानंतर इतिहासातील बारकावे जर सत्य लिहले असतील तर व्यवस्थित लिहले असतील तर पुढच्या

पिढयाचे गैरसमज होणार नाहीत तसेच हे एतिहासिक पुरावे पुढच्या पिढयाना मार्गदर्शन करणारे ठरणार आहेत म्हणूनच मला सदानंद मोरे यांनी सामाजातील त्यावेळी घडलेले आडवे उभे ताणेबाणे अगदी व्यवस्थित संकलित करून मांडले आहे. प्रत्येक गोष्टीचा पातळ पदर अगदी व्यवस्थित उचललेले आहे हे कौतुकाचे काम आहे याचा फायदा पुढच्या पिढयांना निश्चित होणार आहे.

आपल्या लेखणीद्वारे त्यांनी मराठी भाषेच्या संस्कृतीच्या गुप्त धनाचा ठेवा उघड करावा जो सर्वसामान्यांपर्यंत पोहचावा त्यात काय आहे हे उलगडून दाखविण्याची ताकद अशा विद्वानांच आहे त्यांनी आपल्या या शक्तीज्ञानाचा उपयोग करून अंधारात पडलेल्या हिऱ्यांना उजाळा दयावा म्हणजे समाजातील लोकामधील विचारामध्ये असलेले न्यूनगंड निघून जातील नाहीतर पंडित नेहरूच्या बाबतीत जे घडले तसे पुन्हा काही तरी घडले जाईल.

## तुकोबांची कविता

तुकोबाच्या कवितेमधील कालतीतता किंवा तिचे सततचे समकालिनत्व हे महाराष्ट्राच्या प्रादेशिक भूसीमेने मर्यादित असेल असे कोणाला वाटेल पण ते तसे नाही. तुकोबांच्या कवितेचे कायमस्वरूपी समकालीनत्व देशातीत आहे. या अर्थाने तुकोबा साऱ्या विश्वाला आपला स्वदेश मानतात.

आमुचा स्वदेश। भुवन त्रयानाजी वास असा त्यांचा आत्मविश्वास आहे हे विश्वाचि माझे घर । ऐसी मति जयाची स्थिर असे ज्या प्रकारच्या भक्तांचे वर्णन ज्ञानदेव करतात त्या प्रकारात तुकोबा बसतात.

अमेरिकेमधील आयोगा सिटी येथील वास्तंव्यात ( १९७६) तुकोबांच्या अभंगाचे इंग्रजी भाषांतर करणाऱ्या दिलीप पुरूषोतम चित्रे यांच्या अनुभवाची साक्ष काढायला हरकत नाही उण्यापुऱ्या दिडशे अभंगाच्या अनुवादाचे हस्तलिखित चित्र्यांनी आयोगा विद्यापीठात अनूवादाचे तंत्र व सिद्धांत शिकविणारे आधुनिक रशियन कवितेचा इंग्रजी अनुवाद करणारे आणि मॉडर्न पोएट्री इन ट्रान्स्लेशन या

पत्रिकेचे संस्थापक संपादक असलेले डॅनियल वाईसबोर्ट यांना दाखविले ते वाचन वाईसबोर्ट यांना तुकोबा वैश्विक महात्मतेचे कवी वाटले. विल्यम ब्राऊन, अँजेला एल्सटोन अशा इतरही कवि अनुवादक मित्रांना हे अनुवाद चित्र्यांनी वाचायला दिले. चित्रे सांगतात यातल्या कोणाला तुकारामाची कविता जॉन डन या एलिझाबेथ कालीन कवी सारखी वाटली तर कोणाला विल्यम ब्लेकसारखी वाटली. कोणी ' सान हुआन द ला कुझ या स्पॅनिश गुढवादी कवीशी तुकारामाची तुलना केली तर कुणाला माइष्टर एकहार्टसारखी जर्मन मूडवादी भक्ताची आठवण झाली. काहीना तिच्यामुळे नितश, कीएर्कॅगर, हायडेगर यांच्यासारख्या अस्तित्ववादी तत्वज्ञांची आठवण झाली. या वाचकांच्या दृष्टीने तुकाराम जुना नव्हता, निव्वळ मराठी नव्हता, भक्तीमार्गा हिंदु नव्हता तर कायमचा समकालीन असा अभिजात कवी होता. त्या लोकांना विठ्ठल ठाऊक ना पंढरपूर.!

मानवी आत्मस्थिती त्यांना ओळखता येते कारण तिला स्थळाकाळाचे बंधन नाही. जॉन हॉयलंड या अमेरिकन सद्गृहस्थांनी १९३४ मध्ये तुकोबांच्या काही अभंगाचा इंग्रजी अनुवाद प्रकाशित केला नुकतेच १९९२ मध्ये त्याचे पुर्नमुद्रण झाले. हॉयलंड साहेब निवेदनात कबूल करतात की

To Obtain a correct idea, of the quality of Tukaram's verse with its remarkable terseness its musical rhtyming and its freshness and simplicity the poem must of Course be read in the original Marathi No translation can ever hope to reprodace those qualities.

परंतु तरीही केवळ अनुवाद वाचून एलन क्लेम्पटर या प्रस्तावनाकारांनी हायलंड साहेबांनी हा अनुवाद केल्याबद्दल त्यांच्या विषयीचे ऋण व्यक्त केले आहे का तर या कविता

May speak to us today as deeply and freshly as if we and the poet were contenparies which in a sense we are

काही वर्षापूर्वी लेखक सदानंद मोरे यांच्या समवेत डॉ इरिना ग्लुश्कोव्हा या

रशियन विदुषीने रशियन भाषेत तुकोबांचा अनुवाद केला.

अशा प्रकारे तुकोबांना सार्वदेशिक समकालीनत्व लाभले होते.

तुकोबांच्या कवितेत मुळातच अशी सार्वत्रिकता असल्यामुळे त्यांचे वेगवेगळया देशातील व वेगवेगळया कालखंडातील कवीशी धर्मवेत्यांशी वा तत्ववेत्यांशी असलेले साम्य वेगवेगळया अभ्यासकांना प्रतीत होत असते.

प्रसिद्ध ख्रिश्चन मिशनरी मरे मिचेल याने तुकोबांच्या अभंगाची मराठी मनावर असलेली जबरदस्त पकड प्रत्यक्ष अनुभवली होती. आपणही याच शैलीने उपदेश केला तर ख्रिस्तांचा संदेश लोकांपर्यत पोहचविण्यात यशस्वी होवू या शुद्ध साधनवादी भूमिकेतून मिचेलने अभंग लिहीले यातून असे दिसते की मराठी सस्कृतीची नस मिचेल ला गवसली गेली अशा प्रकारे तुकोबांची कविता ही मराठी संस्कृतीची नस होती या नसेद्वारे मराठी संस्कृतीची ओळख सर्वत्र झाली सार्वदेशिक झाली.

संताचा अनुवाद

साहित्य व्यवहार हा मानवी संस्कृतीमधील एक महत्वाचा व्यवहार आहे. मराठी साहित्यकारांनी आणि समीक्षकांनी तुकोबांकडे कवि म्हणून कसे पाहीले त्यांना काय प्रतिसाद दिला याचा विचार करणे तुकाराम दर्शनचा एक भाग ठरतो न्यायमुर्ती रानडे यांनी मराठीतील पहिले ग्रंथकार साहित्य संमेलन भरविल्यानंतर या साहीत्य व्यवहाराला एक संस्थात्मक संघटित स्वरूप प्राप्त झाले. साहित्य समीक्षेला एक व्यापक परिणाम आणि परिप्रेक्ष्य याचा लाभ झाला.

तुकारामगाथा म्हणजे मराठीतील गीताच होय गीते खालोखाल तुकारामाच्या अभंगाचे वाचन होत असते. चि. ग. भानू हे तुकोबांची सॉकेटिशची तुलना करतात. पण ते तुकारामाच्या अभंगाकडे काव्य म्हणून पाहयला तयार नाहीत.

बालकवींनी रचलेल्या अभंगावर तुकोबांची छाप स्पष्ट दिसते. उदा –

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । संतजनी वर्म सांगितले.<br>
तयांचे भजन घडो अहर्निश । माझ्या मीपणास आग लागो ।।

परउपकारी वेचो सर्व शक्ति । हेचि माझी भक्ति पामराची
सर्वही आघात येवो मजवरी । सुखी राहो परी देव माझा ।।
नको स्वर्गवास जपधन किर्ती । प्रेमाची संपत्ती प्रेमरूप.

बालकवींना त्यांच्या कवितेचा सांधा संताच्या काव्याशी जोडावयाचा होता. तशी त्यांची धडपडही चालू होती. मरणापूर्वी बालकवींनी केलेले काही अभंग पहा.

1. देउळीचा देव मेला । विश्वी विश्वरूप झाला ।।
देव झाला शतखंड । तेणे कोंदले ब्रम्हांड ।।
कियाकर्मी देव नाही ।। देव कीर्तनी न राही ।।
देव नाही ज्ञानामधी ।। ती तो देवाची समाधी
सत्य देव विश्वांतरी ।। हिंडतसे दारोदारी ।।

2. एक देव कष्ट करी ।। एक उघडा शरीरी.
एक पोटासाठी फिरे ।। एक भुकेलेला मरे ।।
एक देव झाला रोगी ।। देह दुःखी दुःख भोगी ।।
एका आपंगिता नाही ।। देव दिनवाणा पाही ।।
ऐसे देव नाना परी ।। हिंडताती दारोदारी ।।

3. नको पुण्याईचे ओझे ।। सर्व म्हणा माझे माझे
नका ठेवू अहंकार ।। करा साहय थोडे फार ।।
नका लाजे देवू थारा ।। सर्वेश्वर आणा घरा ।।
नको संपत्तीची चाड ।। नको कीर्तीचेही वेड ।।
दारी पडे देव राणा ।। त्या मंदीरात जाणा ।।

4. माझे हदय मंदीर ।। माझ्या देवाजीचे घर ।।
माझे तीस कोटी देव ।। नको अद्वैताचे नांव ।।
जळो माजी दोषदृष्टी ।। जीव तुटी तयासाठी
हाते घडो त्यांची सेवा ।। निदिध्यास लागो जीवा ।।
म्हणे रमाईचा बाळ ।। हीच आस सर्व काळ

या आपल्या कवितांना बालकवींनी शिर्षक दिले आहे. संताचा अनुवाद या शिर्षकाखाली अभंग असेही लिहले आहे

माझे लेखी देव मला (२३३९) असे म्हणू शकणारा इश्वरवादी कवी म्हणजे तुकोबा, बालकवी देउळीचा देव मेला असे म्हणतात. ज्यासी आपंगिता नाही (३४७) असा तुकोबांनी वापरलेला पण नंतर सहसा कवितेत न दिसणारा आपंगिता हा शब्द बालकवींनी चपखळपणे वापरला आहे.

साठविला हरी ।। जिद्दी हदयमंदीरी (७१३) असे तुकोबा म्हणतात आता बालकवीही देवाला हदयमंदीरात घर देवू पाहतात.

देव झाले अवघे जन दोष गुण हरपले (३१३९) ही तुकोबांची अवस्था प्राप्त व्हावी अशी बालकवीची इच्छा आहे. बालकवीचा हा संताचा अनुवाद मुख्यत्वे तुकोबांचा अनुवाद आहे.

तुकोबांच्या कवितेचा कविता म्हणून विचार होवू शकतो. याची जाणीव असलेली एक व्यक्ती समीक्षा वगैरे वाङ्‌मयीन व्यवहाराशी साक्षात संबंध नसलेली आहे. आणि ती म्हणजे बडोदा संस्थानचे अधिपती महाराज सयाजीराव गायकवाड कोल्हापूर येथे भरलेल्या सतराव्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात पुढील विधान आहे.

Spontaneous overflow powerfull fillings प्रबळ भावनाचा सहजोद्रेक ही वर्डस्वर्थची व्याख्या तुकोबांच्या कवितेला तंतोतंत लागू पडते.

शांताराम अनंत देसाई इंदूरच्या होळकर कॉलेजमध्ये प्राध्यापक होते त्यांनी तुकारामाच्या " अभंगरत्नाचे हार " या नावाने एक महत्वपूर्ण पुस्तक लिहले आहे त्यात तुकोबा आणि प्रसिद्ध इंग्रजी कवी ब्राऊनिंग यांच्या कृतींची तुलना केली आहे.

प्रा. सुप्रिया सहस्त्रबुद्धे यांनी तुकोबा आणि इंग्रजी साक्षात्कार वादी कवी जॉन डफ यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

अशा प्रकारे भारतीय संस्कृतीचा साहित्याचा वेध घेताना तुकाराम व

तुकारामांची कविता उपयोगी पडते. त्यातून नवीन साहीत्याला मार्गदर्शन मिळते नवीन साहित्याची निर्मिती होते. ही बाब अभिमानाची व कौतूकाची आहे.

तुकोबांची वचने

तुकोबांची वचने केवळ सुभाषिते नाहीत. सुभाषितांमध्ये चांगला विचार अलंकारीक भाषेत सांगितिलेला असतो. त्यामुळे तो पटकन नजरेत भरतो पक्का लक्षात रहातो तुकोबांची वचने उत्कट आहेत. ती एकदम ह्यदयाला भिडतात त्यात अलंकारिकता असली, तरी खूपच कमी असते. सुभाषितांचे पाठांतर करावे लागते ती कुत्रिम असतात तुकोबांची वचने सहज असल्याने त्यांच्या म्हणी झाल्या त्या पाठ कराव्या लागत नाहीत. धंदेवाईक वक्त्याला तुकोबा फारसे उपयोगी पडत नाहीत. कारण अश्या वक्त्याची भिस्त श्रोत्याला तेवढयापुरते चकित करण्यावर असते. तुकोबांचा हात धरला की खोल पाण्यात उतरावे लागते. ते आपल्याला अंतर्मुख बनवतात त्यामुळे भाषेचा उपयोग ज्याला केवळ चटपटीत आणि चुरचुरीत करायचा असतो तो तुकोबांच्या वाटेला सहसा जात नाही.

तुकोबांच्या वचनाना माधवराव पटवर्धनानी अनेकदा उपयोग करून घेतला आहे. उदा :-

कन्या सासुरास जाई । मागे परतून पाही ।।

डोळे वळीत बापुडे । पाय जाताच पुरे वेडेवाकुडे मी गातो । आणि तुझा म्हणवितो प्रेम तुला कळविले माझा केवढा अन्याय । तुझे अंतरले पाय ही ओळ त्यांनी काय तुक्याचा अन्याय त्यास अंतरले पाय या तुकोबांच्या ओळीवरून घेतली पांडुरंगाला आळवताना माधवराव तुकोबाच्या पांडुरंगा असे म्हणतात यावरून माधवरावांना तुकोबा व पांडूरंग यांचे तादात्म किती भावले हे दिसून येते तुकोबांच्या वचनांचा उपयोग आजही मोठयाने व नव्याने अनेक गोष्टीत केला जातो. आपल्याला काहीवेळा माहीतसुद्धा नसते हे तुक्याचे वचन आहे. इतकी वर्षे तुकारामांची वचने

चालत आली आहेत व अशीच ती पुढे पुढे चालत राहणार यात शंका नाही कारण ती मराठी भाषेची अविभाज्य अंग बनली आहे. मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी ती उपयोगी पडली आहेत

## तुकोबा व धर्म

तुकोबांच्या धर्माचे स्वरूप नेमके कसे होते हे त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर मोरे यांनी या ग्रंथात तुकारामांचे दोन अभंग उद्धृत केले आहेत.

1. धर्माचे पालन । करणे पाषांडखंडन ।।
   हेचि आम्हा करणे काम । बीज वाढवावे नाम ।।
   तीक्ष्ण उतरे । हाती घेऊनि बाण फिरे ।
   नाही मीड भार । तुका म्हणे सान थोर ।।
   ( २१३६ )
2. धर्म रक्षावयासाठी । करणे आटी आम्हासी ।।
   वाचा बोलो वेदनीती । करू संती केले ते ।।
   न बाणता स्थिती अंगी । कर्म त्यागी षंड तो ।।
   तुका म्हणे अधम त्यासी ।। भक्ती दुषी हरीची ।।

आपले जीवीत कार्य धर्माचे पालन हेच असण्याचे तुकोबा सांगतात. त्यांचा सारा आटापिटा याचसाठी आहे. त्यासाठी तीक्ष्ण टोकदार शब्दांचे बाण घेवून सर्वत्र फिरतात या वाग्बाणांचा उपयोग करताना ते लहानथोर असा भेद करीत नाहीत. कोणाचा मुलाहिजा ठेवत नाहीत. तुकोबांच्या धर्माचा संबंध नीतीशी आहे. कर्मकांडाशी नाही धर्मनीतीचा व्यवहार ते सांगतात.

तुकोबांच्या या धर्मात कर्मत्यागाला स्थान नाही. तुकोबांचा भक्तीधर्म मुख्यत्वे नामस्मरणात्मक आहे. त्याला इश्वराचे अधिष्ठान आहे. " भक्ती, राजकारण आणि समाजकारण या तिघांची सांगड घालून तुकोबांनी आदर्श राष्ट्रधर्म लोकांसमोर ठेवण्याचे धाडस केले" असा अभिप्राय पन्नास वर्षापूर्वी तुकोबांची राष्ट्रगाथा सिध्द

करणा–या नागपूरच्या डॉ. इंदुभूषण भिंगारे आणि कृष्णराव देशमुख यांनी व्यक्त केला होता.

तुकोबांच्या धर्मात जाती वंशाला स्थान नाही. माणूस व त्याचे कार्य आणि इश्वराचे स्मरण याशिवाय इतर कोणत्याही अनाठायी गोष्टींना थारा नाही.
" सावध करी तुका । म्हणे निजले हो आईका " हे तुकोबांचे वचन उध्दृत करून सुंठणकर तुकोबांच्या कार्याचा बरोबर परिचय करून देतात हे जागरण तुकोबांचे महत्वाचे कार्य आहे. तुकोबांच्या भक्तीची झेप फार मोठी असल्याचेही ते निदर्शनास आणून देतात.

तुकारामाने विश्वाशी एकरूप होवून आणि साक्षात्काराचा ध्यास घेवू (मानवजातीच्या जन्मापासून बाहय जग आणि मानवातील अंतस्थ जग याचा जो सतत संघर्ष चालला आहे ) या संघर्षाला तोंड देण्याचा मार्ग पत्करला तो विश्वमय झाला होता. निसर्गाशी तादाम्य पावला होता.

तुकाराम हा ख–या अर्थाने लोककवी होता हयातभर तो सामान्य जनात वावरला. त्यांच्याशी समरस झालेला होता त्यांच्या सततच्या उपदेशामुळे त्यांचे अभंग म्हणीसारखे लोकांच्या तोंडात बसले होते. ते लोकांच्या वाणीत तसेच त्यांच्या अंतकरणाला ठसले आहेत.

तुकोबा अनेक आपत्तीमधून तावून सुलाखुन आल्यामुळे त्यांना जगाचा खूप अनुभव आला होता. त्यांनी समाजाचे समाजातील निरनिराळया थरांचे आणि श्रेष्ठ कनिष्ठ व्यक्तिंचे आचारविचार यांचे सूक्ष्म निरीक्षण केले होते हे सांगून तुकाराम हा भोळसट देवपिसा होता ही कल्पना टाकून द्यावी लागते तो व्यवहार चतुर आणि समाजनिरीक्षक होता हे बा. र. सुंठणकर स्पष्टपणे सांगतात.

सामाजिक अन्यायाचा प्रतिकार करताना व्यक्तिनिरपेक्ष निष्ठूरतेची भूमिका घ्यायला हवी ती तुकोबांनी घेतली.

प्रायश्चित देत तुका । जातो लोक सकळा.
धरितील ते तरतील मनी । जाती घाणी वाया त्या ।।

निग्रह अनुग्रहाचे ठाय । देतो घाय पाहोनी ।।
तुका झाला नरसिंही । भय नाही कृपेने ।।

न्यायाधिश गुन्हेगाराला कडक शिक्षा ठोठावतो तेंव्हा तो स्वतः निष्ठुर नसतो. पण न्यायनिष्ठुर असतो. तसेच त्यांचे आणि संबंधित गुन्हेगाराचे व्यक्तिगत वैमनस्य नसते. तो त्याचा या अर्थाने द्वेष करीत नसतो.

तुकोबांचा दोष हा मुक्तीबोधांच्या शब्दात प्रेमाधिष्ठीत द्वेष आहे व प्रेम हे जाज्जल्य प्रेम आहे.

तुका म्हणे ऐशा नरा । मोजूनि माराव्या पैजारा, तुका म्हणे त्याच्या थुंका तोंडावरील तुम्हा म्हणे गाढव लेका । जेथे भेटेल तेथे ठोका इ. प्रतिकाराचे मार्ग तुकोबांनी स्पष्टपणे इतरानाही सांगितले आहेत आणि ते स्वतः आक्रमिले आहेत, यात शंका नाही तुकोबांच्या व्यक्तित्वामधील हा प्रेममूलक द्वेष आणि त्यांतून निष्पन्न होणारी प्रतिकार क्षमता हे त्यांचे वैशिष्ठ आहे व ते मुक्तिबोधांनी बरोबर टिपले आहे. अर्थात तुकोबांच्या व्यक्तित्वामधील हे अंग नेहमीच दुर्लक्षित झाले आहे.

मुक्तिबोध संत तुकोबामधील द्वेष भावना अधोरेखित करून थांबत नाहीत. संत ही कोटी त्यांच्या लेखी इतिहास जमा झालेली बाब नाही येथे मुक्तिबोध परंपरेला वर्तमानकक्ष करतात आधुनिक युगात व्यवस्थेचा द्वेष करून न्याची स्थापना करण्यात कटिबद्ध असलेल्या क्रांतीच्या पाईकांना ते संत म्हणतात. मुक्तिबोधाची ही झेप विलक्षण धाडसाची आहे.

मृत्युहि उंच खाली वाकून काळया वस्त्रांत तनु झाकून घालतो फेऱ्या खोल्या खोल्यांच्या दारावरून आत झोपलेत आजचे अंत मनुजभक्षी व्यवस्थांचे कर्दनकाळ। दीर्घद्वेषी हे संत, कुडकुडत ते आत झोपले गारठयामध्ये पेटवूनीया स्वप्नांची लाल लाल शेकोटी.।

अनेक मार्क्सवादी ज्याला बळी पडतात तो बाळबोध आणि यांत्रिक प्रतिबिंबवाद मुक्तिबोधांना मंजूर नाही त्यांच्या मते भारताचे चातुर्यवर्णधिष्ठीत स्वरूप

मार्क्सवादयांनी खऱ्या अर्थाने लक्षात घेतले असावे असे वाटत नाही तसे झाले असते तर भारतीय परिस्थितीत अनुकुल असा मार्क्सवादाचा सृजनशील असा वेगळा विकास झाला असता.

हे सृजनात्मक कार्य टाळल्यामुळे किंवा नकळत टाळले गेल्यामुळे मुख्यतः आर्थिक आघाडीवरच मार्क्सवादाला कार्य करता आले भारतीय मार्क्सवादाला तीन कामे करायची होती.

1. शेतकरी कामगारांचे आर्थिक लढे लढवणे
2. स्वातंत्र्याच्या चळवळीत इतर वर्गासह सामील होणे
3. थातूरमातूर पणे पूर्वी अमलात आलेली सामाजिक प्रबोधनाची प्रक्रिया सखोल व्यापक व जलद करणे.

या तिन्हीही कार्याना एकाच सुसंगत धोरणाच्या तत्वात गोवून टाकून तदनुसार क्रांतीची साधने सिद्ध करणे हे भारतीय मार्क्सीवादासमोर होते. पैकी पहिले कर्तव्य मार्क्सवादयांनी महत्वाचे मानले दुसऱ्याबद्दल त्यांना नीटसा निर्णय घेता आला नाही व तिसऱ्या कामाची वैचारीक पातळीवरच त्यांना दखल घेता आली नाही.

मार्कवादयाच्या बाबतीत जे घडले ते मोरे यांनी मुक्तीबोधाचा निमिताने घेतले अशाप्रकारे कोग्रेस पक्ष, भारतीय पातळीवरचा प्रादेशिक शेतकरी कामगार पक्ष व सत्यशोधक, ब्राम्हण ब्राम्हणेतर चळवळ यांचाही परामर्श घेताना काही ऐतिहासिक ताण तणाव उलगडण्याचा समर्थ प्रयत्न केला आहे.

फुल्यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक चळवळीच्या अगोदरच्या पिढयांमधील कित्येक कुंटुबे पिढीजात वारकरी होती कित्येकांना वारकरी विचारांची पार्श्वभूमी लाभलेली होती धार्मिक ढोंग, शोषण, बुवाबाजी, फसवे कर्मकांड यांच्या विरूद्ध उभे ठाकणे हे मूळ वारकरी परंपरेशी सुसंगतच आहे.

सांप्रदायिक साचेबंदामुळे ज्यांची त्या वेळी कोंडी झाली होती असे अनेक वारकरी सत्यशोधक समाजाच्या चळवळीत सामील झाले.

फुल्यांनी चळवळीच्या दृष्टीने भारतातच्या इतिहासाची फेरमांडणी केली.

ऐतिहासिक व्यक्तिरेखांचा नव्याने अन्वयार्थ लावला त्यांचा शिवाजी हा जसा शेतकऱ्यांचा राजा आहे. तसे ते तुकोबांच्याकडे शेतकऱ्यांचा संत म्हणून पाहतात सत्यशोधकाना तुकोबा जवळचे वाटले कारण तुकोबांचा व्यापक तात्विक आशय प्रार्थना समाजाने घेतला तर सत्यशोधकांनी त्यांची ब्राम्हण समीक्षा उचलली

रानडे आणि फुले अशा प्रकारे तुकोबांची दोन पैलूंचे प्रतिनिधित्व करतात.

प्रार्थना समाजाचे तुकाराम प्रेम हे आंधळे किंवा भाबडे नव्हते तुकोबांही प्रार्थना समाजनिष्ठा विचारपूर्वक केलेली निवड होती.

सत्यशोधक ब्राम्हणोतर चळवळीतून कॉंग्रेसमध्ये आलेल्या पण तेथे भ्रमनिरास झालेल्या मंडळींनी फुले मार्क्स असा समन्वय साधीत शेतकरी, कामकरी पक्ष स्थापिला तर याच परंपरेतील बुद्धिमंतानी कॉ. लिमयांच्या संगतीने लाल निशाण पक्षाची ध्वजा उभारली.

महाराष्ट्रातील मार्क्सवादयांचा एक मोठा गट दरम्यानच्या काळात मानवेंद्रनाथ रॉय यांच्या छावणीत दाखल झाला रॉय यांच्या व्यक्तित्वाचे व विचारांचे एक कुतुहल अकर्षण तेंव्हा फैलावले होते. रॉय यांचे अद्‌भूत रम्य चरित्रही काही कमी मोहक नव्हते रशियन कम्युनिष्टांच्या अगदी अंतवर्तुळात प्रविष्ट होवून केलेल्या कार्यामुळे आणि नंतर रशियातील साम्यावादी व्यवस्थेवर टीका केल्यामुळे रॉयना आंतरराष्ट्रीय वलय लाभले होते.

महाराष्टातील अनेकांवर रॉय यांचा प्रभाव पडला बा. र. संठणकर हे त्यांच्यापैकी एक अग्रगण्य आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहास लेखनाचेही कार्य अत्यंत महत्वाचे कर्नाटक महाराष्ट्र सीमा लढयातील त्यांची कामगिरीही उल्लेखनीय १९४८ मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य या पुस्तकात मार्क्सवादी अन्वेषण पद्धती आणि रॉय यांचा प्रभाव दिसून येतो.

बा. रं सुठंणकर यांच्याप्रमाणे तर्कतीर्थ सुद्धा रॉयवादीच तर्कतीर्थांनी भारतीय पारंपारिक ज्ञान आणि पाश्चात आधुनिक ज्ञान या दोहोमधेही प्रविष्य संपादन केले विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाच महाराष्ट्रातील वैचारिक नेतृत्व तर्कतीर्थनी केले असे

म्हटले तर अतिशोक्ती होणार नाही. एवढा त्यांचा प्रभाव या कालखंडावर दिसून येतो. यशवंतराव चव्हाणांचे ते जवळ जवळ राजगुरूच असल्याचे मानले जाई.

तर्कनीथीनी प्रार्थना समान सत्यशोधक समाज मार्क्सवाद रॉयवाद करत गांधीवादी जवळीक साधली.

सत्यशोधकांची चाह करता करता त्यांनी जोतीराव फुल्यावरील महत्वाचे पुस्तक ज्योतीनिबंध लिहले.

विठ्ठल रामजी शिन्दे यांचे अनुयायी रा. ना. चव्हाण यांच्या साहयाने बहुजन समाजाच्या चळवळीचा इतिहास लिहण्याचा संकल्पही सोडला होता. पण पुढे बहुजन समाजाला राजकीय सत्तेचा लोभ झाल्यामुळे हा संकल्प बारगळला.

तर्कतीथीच्या वैदिक संस्कृतीचा विकास या पुस्तकाला तुकारामदर्शच्या संदर्भात विशेष महत्व आहे वैदिक संस्कृतीवरील ग्रंथातील तर्कतीर्थाचे तुकोबांविषयी विवेचन आत्यंत महत्वाचे आहे. कारण हा ग्रंथ एतिहासिक पारिप्रेक्ष्यातून लिहलेला असल्यामुळे त्यात तुकोबांचे स्थान निश्चिती झालेली आहे. कोणत्याही व्यक्तिचे ऐतिहासिक महत्व समजण्यासाठी तिची स्थान निश्चिती होणे आवश्यक असते.

तर्कतीर्थानी तुकोबांची निश्चितती करताना तुकोबांना केवळ महाराष्ट्रातील वारकरी परंपरेचे कळसच म्हटले नाही तर थेट वेदकाळापासून सुरू झालेल्या एक अक्षुण्ण धारेची पूर्ण परीनीती म्हटले आहे. तर्कतिर्थाचे तुकारामदर्शन अत्यंत सुक्ष्म आहे. तर्कतीर्थासारखा वैदिक परंपरेची सांगोपांग सूक्ष्मातिसुक्ष्म, खडानखडा माहीती असलेला एक महापंडित हे म्हणत आहे. आधुनिक जडवादी शास्त्रींची पूर्ण ओळख असलेली एक विलक्षण विद्वाता हे म्हणत आहे याला फार महत्व आहे

सत्यशोधक चळवळीला प्रार्थना समाजाच्या विचारांची जोड मिळाली म्हणजे जातीद्वेषाची विखार शांत होवून सात्विक समाजाचितन कसे प्रगटते याचे रा. ना. चव्हाण मुर्तीमंत उदाहरण होते. वेगवेगळया विचारवंताचा आणि नेत्यांचा त्यांनी तटस्थपणे जो तौलनिक विचार केलेला होता त्याला महाराष्ट्रत जोड नाही.

वैचारिक समन्वय आणि सामाजिकतेचा विकास या एका महत्वाच्या लेखात रा. ना.

चव्हाणांनी धर्मचितनातिल समन्वय आणि सामाजिकता यांचा अन्योन्य संबंध दाखवून दिला आहे.

संतानी राष्ट्र व सामाजिकता यांची धारणा केली ज्ञानेश्वर, एकनाथांनी ब्राम्हण्य बोथट केले तुकारामाने कळस केला व नंतर शिवराय उदयास आले सामाजिकतेच्या नौतिक गाम्याचे महत्व चव्हाणानी फार चांगले विषद केले आहे.

साधूसंतानी नैतिक चाड निर्माण केली त्यामुळे राष्ट्रीय शिस्त एकोपा वैगेरे गुण अप्रत्यक्षरीत्या जोपासले गेले व महाराष्ट्राचे नैतिक सामर्थ्य पुढे कमी पडले नाही.

रा. ना. चव्हाण म्हणतात प्रार्थना समाजाकडे आकृष्ट होण्यास तुकाराम कारण झाला. तुकोबाच्या चरित्रात वीर आणि शांत या दोन्ही रसांची अभिव्यक्ती आहे.

तुकोबांच्या अभंगवाणीतून व्यक्त होणारे त्यांचे विचारविश्व आणि अनुभव विश्व अत्यंत समृद्ध आहे. नरसी मेहता हे वैष्णव कवी गुजराती तर मीराबाई गुजराती – राजस्थानीचे मुळ स्वरूप असलेल्या भाषेत रचना करीत

तुकोबांच्या अभंगातून कबीर, नरसी मेहता आणि मीरा या उत्तरेकडील तीन संताचे उल्लेख आढळतात विशेषतः कबीरांच्या काव्याचा व विचारांचाही तुकोबांवर प्रभाव होता मध्ययुगातील जीवन ठप्प होते एकमेकांत दळणवळण नव्हते असे भ्रामक समज सामान्यांचे काय ? परंतु अभ्यासकांचेही दिसून येतात पण ते योग्य नाही स्वतः तुकोबांना हिंदुस्थानी भाषा चांगली अवगत होती त्यांची अनेक हिंदी पदे उपलब्ध आहेत.

तुकोबांचा गौरवाकरीता वेगळी स्तुतिसुमने उधळण्याची अतिशोक्ती करण्याची गरज नाही तुकोबा जगे आहे गौरव सांगवे त्यांनी जे केले त्याचे निरूपण करणे हाच त्यांचा गौरव तुकोबांच्या बाबतीत वर्णनाची भाषा हीच गौरवाची भाषा ठरते

तुकोबांच्या अभंगवाणीत समकालीन समाजाची समीक्षा आहे. म्हणजे एकाच वेळी तुकोबा आत्मनिष्ठा आणि परनिष्ठा अशा दोन्ही प्रकारच्या कविता लिहीतात समकालीन काव्य आणि काव्य जाणीवा यांच्या पार्श्वभूमीवर तुकोबांच्या कवितेचे

वेगळेपण डोळयात भरण्यासारखे आहे तुकोबांच्या हयातील त्यांची अभंगवाणी महाराष्ट्रांत सर्वत्र पसरली होती दुसरे असे की तिला विरोध करून ती नष्ट करण्याचा जो प्रयत्न झाला होता त्यातून ती तावून सुलाखुन निघाली असल्यामुळे तिला एक प्रकारे दैवी वलय प्राप्त झाले होते तिचा प्रभाव महाराष्ट्रावर पडला होता

डॉ र. रा. गोसावी म्हणतात त्याप्रमाणे तुकोबांची अभंगवाणी आपल्या मठामठातून जतन करण्याचे औदार्य रामदासी सांप्रदायिकांनी दाखविले हे खरे असले तरी त्या वाणीचे सामर्थ व आकर्षण शक्तीही तशीच होती हे विसरता कामा नये विशेष म्हणजे एरवी वारकरी संप्रदायाची आपरंपारीक मते न मानवल्यामुळे सवता सुभा काढणारे रामदासही या प्रभावापासून पूर्णपणे अलिप्त राहू शकले नाही. खुद्द कल्याण स्वामीच्या हस्ताक्षरांतील समर्थाच्या दोन रचना उद्धृत करून त्यांच्यावर तुकोबांच्या ज्या अभंगाचा ठसा आहे ते अभंग सदानंद मोरे यांनी या ग्रंथात मांडले आहेत.

सनातनी प्रवृतीच्या लोकांनी तुकोबांचा घातपात केला हे मत महाराष्ट्रातील ब्राम्हणेतर चळवळीतून पुढे आले नाशिक जिल्हयातील नांदगावाच्या पांडूरंग बाबानी कवडे या तुकाराम चरित्रकाराने हा पक्ष पहील्यांदा जोरात मांडला. अलीकडे अमरावतीचे सुदाम सावरकर यांनी तुकारांमांचे संदेह वैकुंठगमन की खून? अशा शीर्षकाचे स्वतंत्र पुस्तकच लिहले. कोणत्याही चळवळीत अनेक बळी जातात त्यात सत्याचा बळी हा पहिला असतो हे लक्षात ठेवले म्हणजे ब्राम्हणेतर चळवळीतील मंडळीनी ब्राम्हण विरोधाची धार आधिक तीक्ष्ण करण्यासाठी तुकोबांनाही वेठीस धरावे यात विशेष आश्चर्य वाटण्याचे कारण नाही या संदर्भात एवढेच लक्षात घ्यावे की

तुकोबासारख्या त्या काळी सर्व महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेल्या व्याक्तिच्या बाबतीत असे काही घडले असते तर एक तर ते लपून राहीले नसते आणि दुसरे म्हणजे त्याच्या प्रतिक्रिया उमटल्या असत्या तेव्हा तुकोबांच्या निर्याणाबाबतची ही संभाव्यता सक्रुतदर्शनी फेटाळणे भाग पडते त्यासाठी इतिहासाचा अभ्यास आवश्यक आहे, ना तत्वज्ञानाचा व्यासंग थोडासा कॉमन सेन्स वापरला म्हणजे पुरे.!

तुकारामाचे जीवन म्हणजे अखंड प्रयत्नवाद असे साने गुरूजी लिहतात, तुकोबांची गाथा म्हणजे महाराष्ट्राला अखंड बोधामृत पाजणारी कामधेनु होय, सर्वाबद्दल प्रेम सर्वाबद्दल समभाव हे ही तुकोबांचे एक वैशिष्ठ ते सांगतात.

तुकारामांचे अभंग म्हणजे तुमचे आमचे वेद असेही गुरूजी सांगतात.

तुकारामांच्या अभंगावर व ज्ञानेश्वरांच्या ओवीवर सारा महाराष्ट्र पोसला आहे. ज्याला तुकारामाचे चार अभंग येत नाहीत असा मनुष्य महाराष्ट्रात आढळणार नाही.

संतानी महाराष्ट्राला संस्कृतीच्या समान पातळीवर आणले उच्च विचार साध्या भाषेत घरोघरी नेले.

" ग्यानबा तुकाराम " हे महाराष्ट्राच हृदयसम्राट आहेत त्यांचे वाङ्मय हे खरे राष्ट्रीय वाङ्मय कारण ते सर्व थरात गेले.

आम जनतेने तुकोबांची वाणी गेली, तुकारामाच्या अभंगात प्रसाद आहे. कळकळ आहे स्वानुभाव आहे ते रोकडे बोल आहेत.

सावरकरांना बुध्द आणि तुकोबा यांच्याविषयी अत्यंत आदर असला तरी बुद्ध व तुकोबा यांच्या धर्मपंथाना व तत्वांना समजून घेण्यात मात्र त्यांना यश आलेले नाही याचे कारण म्हणजे त्यांचा बुद्धीनिष्ठ राष्ट्रवाद. तुकोबाच्या संदर्भात मात्र गं. बा. सरदार विसरलेले दिसतात. मी कोणत्याही विशिष्ठ वर्गाच्या वा जातीच्या हितसंबंधाचा पाठपुरावा तुकोबांनी केलेला आढळत नाही. रामदास हे ब्राम्हणक्षत्रियांचे प्रतिनिधी तर तुकोबा वैश्य शुद्रांचे प्रतिनिधी असे सरदार म्हणतात वारकरी साहीत्य हा मराठी साहीत्यामधील मुख्य प्रवाह असे हे एकदा ध्यानात आले की र. वा. दिघे आपोआप मराठी कादंबरीच्या केंद्रस्थानी जातात. असे सदानंद मोरे तुकाराम दर्शनात दिघे व त्यांच्या काही कादंबऱ्याचा परामर्श घेवूल वरील विधान स्पष्ट करतात.

दिघांच्या कादंबीरीतील पात्रे वारकरी परंपरेतील आहेत. दिघे हे असे एकमेव लेखक आहेत की जे अत्यंत धाडसाने वारकरी शेतकऱ्याला हिरो बनवतात इतकेच नव्हे तर तत्वज्ञही बनवतात त्यांच्या कादंबऱ्यात तुकाराम किंवा तुकारामांचे अभंग डोकावतात

दिलीप चित्रे म्हणतात की मराठी कवितेकडे मी वळलो याचे कारण तुकोबा तुकोबा आणि मराठी भाषा यांचे निकटचे नाते लक्षात घेवून इंग्रजीत जे स्थान शेक्सपिअरचे ते मराठीत तुकोबांचे असे म्हणत तुकोबांशिवाय मराठी नाही अशी भूमिका चित्रे घेतात.

१९९९ च्या कालनिर्णय मधील वेदांचा तो अर्थ लेख वाचनीय आहे यात कुसुमाग्रज लिहतात आत्मनिष्ठेचे तत्व इंग्रजी काव्याच्या प्रभावाने मराठी काव्यात प्रविष्ठ झाले असे मानणे बरोबर नाही संताचे काव्य बहुतांशी आत्मपर आहे आणि तुकारामाच्या काव्यात तर आत्मपरता पराकोटीला पोचलेली आहे जुन्या कवितच नव्हे तर नव्या कवीतही तुकारामाइतका आत्मनिशठ कवी दुसरा आढळणार नाही. तुकारामांची कविता म्हणजे त्यांचे आंतबाह्य आत्मचरित्र आहे. तुकोबांची आत्मनिष्ठा त्यांना अहंमवादाकडे किंवा स्वार्थपरायणतेकडे किंवा संकुचितेकडे नेत नाही हे लक्षात ठेवले पाहीजे. आत्मनिष्ठा आणि सामाजिक हे आधुनिक काळातील द्वंद्व तुकोबामध्ये नाही त्याप्रमाणे तुकोबांनी " एक युगप्रर्वक अशा विद्रोह लढयाचे नेतृत्व केले" त्यांनी असेही म्हटले आहे की तुकोबांची भाषा ही लढाईतील भाषा आहे. आणि त्यांचे सारे चरित्र म्हणजे अखंड लढाई आहे त्यांचे संतत्व हे प्रखर रणशील आणि निर्भय आहे.

तुकोबांच्या विषयी असे सुत्रमय पण अर्थभरित लिहणाऱ्या कुसुमागजाच्या कवितेत तुकोबा कसे भेटतात.

पर्णपरी वाहुनिया कालप्रवाहात पहा
गेले ते राजमूकुट कनकाचे कोश महा
बुदबुद उठले विरले जे होते ते नूरले
तूक्याचि मधुकविता तरली पण काळनदी

तुकोबांचे यथार्थ आकलन इतके अवघड आहे की ते फक्त तुकोबाच करू जाणे

तुक्याची वाट तुक्यालाच ठावी । वेदार्थाच्या गावी पोचणारी ।।
तुक्याचे मन तुक्यालाच ठावे । वेदांचे थवे पाळणारे ।।

एक इंद्रायणी जाणे त्यास काही । अभंगाची वही गिळणारी

कुसुमाग्रजानंतर सुरेश भटांची कविताही लेखकाने या ग्रंथात दिली आहे.

मी तुक्याच्या लोचनानी
गांजल्यांसाठी रडावे
चोख व्यवहार माझ्या
मी मला वाटुन घावे

भटांनी तुकारामाला उद्‌देशून एक कविता दिली आहे.

तुझे दुःख तुझे नाही ।
तुझे दुःख आमचे आहे ।
अजून त्याच्या डोळियानी
आम्ही प्रत्यय पारखत आहोत ।
अजुन त्याच्या प्रकाशात
आम्ही शब्द वेचत आहोत
अजुन त्याच्या सोबतीने
आम्ही वाट चालत आहोत
तुझे दुःख तुझे नाही

या कवितेत सूरेश भट म्हणतात तुकोबांनी मूळातच इतरांचे दुःख आपले होते असे मानले होते त्यामुळे तुकोबांचे दुःख सार्वत्रिक होवू शकते.

१९३८ मध्ये मरण पावलेले माधव गोविंद भिडे हे तुकोबांचे भक्त व सनातन धर्माचे अभिमानी तुकोंबाची वर्ण व जात हा या काळातील चर्चेचा एक नियमीत विषय होता भिडयांनी आलंकारिक रित्या तुकोबा चारी वर्णाचे होते असे काव्य लिहले.

मनोरथ कल्पदुम्रा नमो नमो तुकारामा ।।
देवाचे जे देवपण । तिचे तयाचे चरण ।।
सेवाधर्म तो शुद्राचा। तीत देह तुकोबाचा।।

वेश्यवृत्ति संपादीली ।। वैश्ययति पूत केली।।

धैर्यवत चालविले । क्षात्रतेज दाखविने ।।

ब्रम्हज्ञान ब्रम्हरूप । तुकी द्विजत्व अमूप ।।

चतुवर्ण एके ठायी । सर्व तुकोबांचे पायी ।।

असे हे तुकाराम महाराज सर्वांचे हे त्यांच्या कार्यातून विचारातून तसेच त्यांच्यावर आजवर झालेल्या लिखाणातून आपल्याला या ग्रंथात दिसून येते.

लेखक सदानंद मोरे यांचे पुढील सर्व पिढयांनी आभार मानावे असे हे त्यांचे लिखाण आहे कारण इतिहासातील अत्यंत सुक्ष्म अशा खाचा खोचा आपणाला माहीत होण्यास तसेच पुढच्या पिढयांना मार्गदर्शन करणारा असा हा ग्रंथ आहे.

पुढील प्रकरणात आपण आ. ह. साळुंखे यांच्या विद्रोही तुकाराम या ग्रंथाच्या निर्मिती मागची लेखकाची भूमिका काय याचा अभ्यास करणार आहोत.